**CNR MHCH080001442025**

## -न्या य नि र्ण य-

(घोषित दिनांक ०३/०७/२०२६)

आरोपीविरूध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(फ)(ई) अन्वये खटला चालविण्यात आला.

२. अभियोगपक्षातर्फे देण्यात आलेल्या पुराव्याचा विचार करता, माझ्या मते खालील प्रमाणे मुद्दे उपस्थित होतात. सदरील प्रत्येक मुद्दयाचा निष्कर्ष मी कारणासहीत अनुमान काढून नोंदवलेला आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोगपक्षाने सिध्द केले काय की, दिनांक २६/१०/२०२४ रोजी १४.१५ ते १४.४५ वाजताचे दरम्यान मौजा खेडमक्ता टोली, ता.ब्रम्हपुरी, जि.चंद्रपूर येथे आरोपी हा दोन ड्रममध्ये प्रत्येकी ८० लिटर प्रमाणे १६० लिटर मोहासडवा, १६ लिटर मोहाफुल दारू व मोहादारू तयार करण्याचे साहित्य एकूण किंमत रू.३०,६००/– चा मुददेमाल विनापरवाना ताब्यात बाळगून असताना मिळून आला व त्या परिणामी त्याने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(फ)(ई) प्रमाणे गुन्हा केला ? | ...नाही... |
| २ | अंतिम आदेश काय? | ...अंतिम आदेशाप्रमाणे. |

**– कारणमीमांसा–**

३. आरोपीवरील दोष सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने दोन्ही पंच साक्षीदारांना तपासले आहेत. परंतु सदर साक्षीदारांनी अभियोग पक्षास सहाय्य केले नाही. त्यामुळे सहायक सरकारी अभियोक्ता यांनी त्यांचा पुरावा बंद केला. आरोपीविरूध्द पुरावा नसल्याने त्याचे भारतीय नागरिक सुरक्षा संहिताचे कलम ३५१(१)(ब) अन्वये बयाण वगळण्यात आले.

४. अभियोगपक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता श्री. एस. डी. हटकर यांचा तर आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. आर. एस. दुबे यांचा युक्तिवाद ऐकला.

सं.फौ.प्र.क्र.८८/२०२५
शासन वि. संदिप
नि.क्र. ११ खाली

**<u>मुद्दा क्र. १ व २ बाबतः</u>–**

५. अभियोग पक्षातर्फे घटनास्थळ पंचनामा व जप्ती पत्रक सिध्द करण्यासाठी पंच सा.क्र.१ कैलास प्रकाश शेंडे व सा.क्र. योगेश्वर प्रल्हाद येरमा यांना तपासले. सदर साक्षीदारांनी त्यांच्या पुराव्यात पोलिसांनी त्यांना दि.२६.१०.२०२४ रोजी पंचनाम्यासाठी बोलाविले नव्हते, तसेच त्यांच्या समक्ष आरोपीच्या ताब्यातून काहीही जप्ती केले नसल्याचे कथन केले आहे. सदर साक्षीदारांनी अभियोग पक्षास सहाय्य केले नाही. सहायक सरकारी अभियोक्ता यांनी न्यायालयाच्या परवानगीने त्यांची उलटतपासणी घेतली, परंतु अभियोग पक्षाला मदत होईल असा कुठलाही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. अभिलेखाचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, आरोपीच्या ताब्यात १६० लिटर मोहासडवा, १६ लिटर मोहाफुल दारू व मोहादारू तयार करण्याचे साहित्य विना परवाना मिळून आला, याबाबतचा कुठलाही ठोस पुरावा अभिलेखावर आलेला नाही. प्रकरणामध्ये रासायनिक प्रयोगशाळेचा अहवाल दाखल करण्यात आलेला आहे. परंतु तथाकथित मोहादारू व मोहासडवा आरोपीच्या ताब्यातून जप्त केल्याबाबत कुठलाही पुरावा अभिलेखावर नाही. त्यामुळे त्याचा फायदा अभियोग पक्षाला होणार नाही. अभियोगपक्षाने आरोपीविरुध्द खटला शंकेपलीकडे जाऊन सिध्द केलेला नाही. करिता मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.२ च्या उत्तरात पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**–<u>आदेश</u>–**

१. आरोपी संदिप मनोहर नागापुरे याची महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(फ)(ई) च्या अपराधातून भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम २७८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे जामीन व बंधपत्र रद्द करण्यात येतात.

३. आरोपीने भारतीय नागरिक सुरक्षासंहितेचे कलम ४८१(१) अन्वये रु.१५,०००/– ची जामीन व बंधपत्र द्यावे.

**न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.**

GAJANAN DEONAND WANTARAM
Digitally signed by GAJANAN DEONAND WANTARAM
Date: 2026.07.03 17:34:13 +0530

दिनांक ०३/०७/२०२६.
ठिकाण– ब्रम्हपुरी.

**(जी. डी. वंतरम)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
ब्रम्हपुरी.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file of judgment are word to word, as per original Judgment.

Name of Stenographer : N. B. Chavhan